मंगळवार,१३ फेब्रुवारी २०२४

# 'विवेकानंद' मध्ये कडधान्य दिन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

लोक फास्ट फूड आणि फ्रोझन फूडला महत्त्व देऊ लागलेत. आहारातील डाळींचा वापर कमी होत आहे. शरीराला पूर्ण पोषण मिळत नसून त्याचे दुष्परिणाम लोकांच्या विशेषतः लहान मुले व तरुणांच्या आरोग्यावर होत आहेत. आरोग्यासाठी आणि अन्नसुरक्षेसाठी असलेले डाळींचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचावे आणि डाळींचा आहारात समावेश करण्यासाठी जनजागृती व्हावी, या उद्देशाने आंतरराष्ट्रीय कडधान्य दिन साजरा करण्यात आला.

प्रदर्शनाचे उद्घाटन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. विवेकानंद कॉलेज वनस्पतीशास्त्र विभागातर्फे विभाग प्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांचा मार्गदर्शनाखाली जागतिक कडधान्य दिना निमित्त वनस्पतींची पाने, फुले व बियांपासून बनवलेले अलंकारांचे प्रदर्शन भरवून हा दिन साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी प्रदर्शनामध्ये ख्रिसमस ट्री ची पाने, विविध. प्रकारचे कडधान्य, शेंगा व बिया, विविध प्रकारचे मसाले, ड्रायफ्रुट्स यांचा वापर करून कर्णफुले, हार, ब्रेसलेट इत्यादी विविध अलंकारे बनवून प्रदर्शन भरवले होते. प्रदर्शनास गणितशास्त्र विभाग प्रमुख प्रा. एस. पी. थोरात व लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा आदी प्रमुख उपस्थित होते.

13/02/24

PR
13.2.24

# विवेकानंद कॉलेजमध्ये स्कूल कनेक्ट अभियान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विवेकानंद कॉलेजमधील एनईपी सेल व शिवाजी विद्यापीठ आयक्यूएसी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये स्कूल कनेक्ट संपर्क अभियान झाले. यात शहरातील पाच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. पहिल्या सत्रात विवेकानंद कॉलेजमधील नोडल ऑफिसर डॉ. सी. बी. पाटील यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे व वैशिष्ट्ये याविषयी मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात नॅक समन्वयक डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी भौतिक व शैक्षणिक सुविधा विषयांवर मनोगत व्यक्त केले. डॉ. एस. एस. अंकुशराव यांनी स्वागत केले. प्रा. समीक्षा फराकटे, प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. डी. आर. तुपे यांनी आभार मानले.